महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११००५

**Maharashtra State Board Of Secondary & Higher Secondary Education,**
**Pune Divisional Board, Pune - 411005**


| DIVISIONAL CHAIRMAN 25536722 (OFF) | DIVISIONAL SECRETARY 25536781/82/83 & 25536712 | FAX - 020 / 25536761 |
|---|---|---|

E-MAIL sscboardpune@gmail.com | web site – www.sscboardpune.in


<u>महत्वाचे</u>

क्रमांक : पुविमं/डीपी/संलग्नता/ /485
पुणे - ४११००५
दिनांक :- २९/१०/२०१८

प्रति,

प्राचार्य,

चाणक्य कनिष्ठ महाविद्यालय,
पिरंगुट, ता. मुळशी, जि. पुणे.

<u>विषय</u> :- उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयास विभागीय मंडळ संलग्नता व तात्पुरता सांकेतिक क्रमांक देणेबाबत. (मार्च २०१९ परीक्षेसाठी)

<u>संदर्भ</u> :- १. आपला प्रस्ताव दिनांक CJC/041/2017 दि. 26/10/2017
२. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचे पत्र क्र. शिउसं/पुवि/उमाशि-१/सांकेतांक/२०१८/७८२८ दि. २६/१०/२०१८
३. शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, पुणे / ~~अहमदनगर~~ / सोलापूर यांचे पत्र क्र. ६७८ दि. २४/१०/२०१८
४. राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा-३/७४८९ दि. ४ सप्टेंबर, २००६.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने व संदर्भानुसार आपल्या उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयास फेब्रु/मार्च २०१९ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी खालीलप्रमाणे तात्पुरती पुणे विभागीय मंडळ संलग्नता व सांकेतिक क्रमांक देण्यात येत आहे.

| इ. १२ वी | | अध्ययनाचे विषय | |
|---|---|---|---|
| शाखा :- Science | मंडळ मान्यता सांकेतिक क्रमांक | १. English | ९. Economics |
| Commerce | J 11.10.014 | २. Marathi | १०. OCM |
| | | ३. Physics | ११. Maths (88) |
| माध्यम :- English | | ४. Chemistry | १२. Phy. Edu. |
| | | ५. Maths | १३. EVS. |
| | | ६. Biology | १४. |
| | | ७. Geography | १५. |
| | | ८. Accountancy | १६. |

आपल्या उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयास मार्च व जुलै परीक्षेसाठी खाली नमूद केल्यानुसार परीक्षा केंद्र निर्धारीत करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| फेब्रु./मार्च परीक्षेसाठी | परीक्षा केंद्र क्रमांक :- | 100 |
| | परीक्षा केंद्राचे नांव :- | पिरंगुट कनिष्ठ महाविद्यालय, पिरंगुट, ता. मुळशी |
| जुलै परीक्षेसाठी | परीक्षा केंद्र क्रमांक :- | 013 |
| | परीक्षा केंद्राचे नांव :- | SNDT College of Science, Karve Road, Pune. |

(कृ.मा.प.)

सदर निर्धारीत करण्यात आलेले परीक्षा केंद्र फेब्रु./मार्च २०१९ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी सादर करण्यात येणा-या ऑनलाईन आवेदनपत्रावर विहीत ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे.

विभागीय मंडळाकडे संलग्नतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये खाली नमूद केल्या त्रुटी आहेत.

१. परीक्षा केंद्राचे संमतीपत्र सादर करावे

२. पुढील पाच वर्षे सलग मंडळ मान्यता नूतनीकरण करावी.

३. ----------

**उपरोक्त त्रुटींची पूर्तता दि. १५ डिसेंबर, २०१८ पर्यंत करावी.** विभागीय मंडळाकडून दिलेला तात्पुरता सांकेतिक क्रमांक कायम करण्यासाठी राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा-३/७४८९ दि. ४ सप्टेंबर, २००६ नुसार आपल्या उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयास दिलेला तात्पुरता सांकेतिक क्रमांक वर्ष २०१९-२०२० पासून शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पर्यंत प्रत्येक वर्षी त्या शैक्षणिक वर्षात १५ मे पर्यंत विहीत नमुन्यात शुल्कासह प्रस्ताव सादर करून मंडळ मान्यता नूतनीकरण करून घेणे आवश्यक आहे.

मंडळ मान्यता नूतनीकरण प्रस्तावात विहीत नमुन्यातील फॉर्म, मंडळ मान्यता पत्राची छायांकीत प्रत व त्या वर्षाकरीता शाळा तपासणी अहवाल (शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी यांचे शिफारशीसह) दि. १५ मे पर्यंत रू. १,०००/- शुल्कासह तद्नंतर दि. ३१ ऑगस्ट पर्यंत रू. १,६००/- (नूतनीकरण शुल्क व दंड) व त्यापुढे प्रत्येक महिन्यात रू. १००/- दंडात्मक शुल्क प्रस्ताव प्रत्यक्ष सादर करेपर्यंत भरावा लागेल.

वरील पध्दतीने व निर्धारीत कालावधीत नूतनीकरण घेतल्याशिवाय आगामी मार्च परीक्षेसाठी परीक्षा आवेदनपत्रे सादर करणे नियमबाहय असेल, याची नोंद घ्यावी. सलग पाच वर्षे मंडळ मान्यता नूतनीकरण करून झाल्यानंतर सन २०१८-२०१९ साठी देण्यात आलेला तात्पुरता सांकेतिक क्रमांक कायम करण्याकरीता शिक्षण उपसंचालक, पुणे यांची शिफारशीसह प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा.

विभागीय मंडळाने दिलेली तात्पुरती मंडळ मान्यता खालील अटी / शर्तींचा भंग केल्यास आपोआप रद्द होईल.

१. पुढील शैक्षणिक वर्षाकरीता मंडळ मान्यता नूतनीकरण न करता परीक्षा आवेदनपत्र भरल्यास.

२. परीक्षा कामकाजासाठी केंद्रसंचालक / दालन पर्यवेक्षक / परीक्षक / नियामक / मुख्य नियामक / प्राश्निक इ. मनुष्यबळ पुरविण्यासाठी नकार दिल्यास.

३. परीक्षा संचालनाकरीता उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधा न पुरविल्यास.

४. विभागीय मंडळ सूचना किंवा आदेशाचे पालन न केल्यास

५. शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर इ. १२ वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थीसंख्येनुसार नोंदणी शुल्क (रजिस्ट्रेशन फी) व शिक्षण संक्रमण फी १० ऑगस्ट पर्यंत मंडळास सादर न केल्यास

६. परीक्षा संचालनामध्ये आपल्या शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांनी गैरमार्ग केल्यास

२/११/१८

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे - ५.

**प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
२. शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, पुणे
३. पुणे विभागीय मंडळातील सर्व शाखा प्रमुख,